२२ वा

# वार्षिक अहवाल

सन २०१८-१९




विना सहकार नाही उद्धार!

पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी. आर./ ९५१/ ९७

प्रशासकीय कार्यालय

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर - १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

Email : parijatsociety@gmail.com / parijatsociety@rediffmail.com

# विद्यमान संचालक मंडळ



श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष (B.Com, G.D.C. & A)



श्री. कैलास वि. खोपडे
उपाध्यक्ष (B.Com, G.D.C. & A)



श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव



श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार (B.A.)



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक (B.com)



श्री. राजेंद्र ना. कोंडे
संचालक (B.Com)



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



सौ. मंदाताई ज्ञा. खोपडे
संचालिका



सौ. लता बा. ताकवले
संचालिका



श्री. काशिनाथ वा. पवार
संचालक,
नगरसेवक, न.मुं.म.पा.



श्री. शिवाजी गं. सुळ
संचालक



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. तानाजी गु. शिंदे
उपमहाव्यवस्थापक
(B.A.,G.D.C. & A,H.D.C.M.)

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

**नोंदणी क्र.** टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) ९५१/९७

**प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर - १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.**

## बाविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि, नवी मुंबई या संस्थेची बाविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२८/०७/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता शिवविष्णू मंदिर हॉल, प्लॉट नं. ८/९, सेक्टर - ०९ अे, वाशी बस डेपोच्या मागे, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा, हि विनंती.

### सभेपुढील विषय:-

१) दि. ०५/०८/२०१८ रोजी झालेल्या एकविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१८-१९ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून स्विकृत करणे.

५) सन २०१९-२० सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६) सन २०१९-२० या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि गत वर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.

७) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

८) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा दोषदुरूस्ती अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे.

९) नियम ४९ नुसार निर्लेखित कर्जास मान्यता देणे.

१०) उपविधीतील पोट नियम दुरूस्तीस मंजुरी देणे.

११) संस्थेच्या नवीन शाखा विस्तार करणेस मंजुरी देणे.

१२) संस्थेच्या मुंबई व पुणे विभागातील शाखांसाठी स्व:मालकीची जागा खरेदी करण्यास मंजुरी देणे.

१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : १०/०७/२०१९

संचालक मंडळाच्या वतीने
**श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले**
(सचिव)

### विशेष सुचना :-

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपुर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.



## अध्यक्षीय मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या २२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संस्थेचा सन २०१८-१९ चा कार्य अहवाल आपल्या हाती सुपुर्द करताना मनापासुन आनंद होत आहे. **'एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ'** या भावनेतुन **'पारिजात पतसंस्था'** दोन दशकांच्या वाटचालीत सभासदांच्या सर्वांगीन विकासासाठी सतत नाविन्याचा व प्रगत तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन पुढे जात आहे.

आपल्या संस्थेने प्रगतीचा आलेख उंचावत ३१ मार्च २०१९ अखेर संस्थेच्या **ठेवी रु. १११ कोटी व कर्ज वाटप रु. ८२ कोटींच्या** पुढे असून संस्थेने **रु. ३५ कोटीपेक्षा** जास्त रक्कमेची स्वतंत्र गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा **स्वनिधी रु. १०.०५ कोटी** आहे. एकुण **व्यवसाय रु. १९३ कोटींचा** असुन, अहवाल सालात एकुण व्यवसाय वाढीचे प्रमाण **११%** इतके आहे. संस्थेला चालु आर्थिक वर्षात आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केल्यानंतर **रु. १.१० कोटीपेक्षा** जास्त निव्वळ नफा झाला आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांनी संस्थेस **ऑडीट वर्ग 'अ'** दिला आहे.

संस्थेच्या **मुंबई व पुणे विभागात प्रशासकीय कार्यालय व १० शाखा** कार्यरत आहेत. संस्थेने प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे सुसज्ज असे **स्वमालकीचे ''डाटा सेंटर''** उभारुन **''कोअर बँकिंग संगणक प्रणाली''** द्वारे संस्था सभासदांना सेवा देत आहे. **प्रशासकीय कार्यालय, वाशी शाखा, कोपरखैरणे शाखा आणि धनकवडी शाखा** या चार कार्यालयाच्या जागा स्वमालकीच्या आहेत.

संस्थेच्या भविष्यातील प्रगतीसाठी **''कोअर बँकिग संगणक प्रणाली''** सेवेबरोबरच डिजिटायजेशनची नितांत गरज ओळखून संस्थेने सभासदांसाठी **पारिजात एम पासबुक सेवा, एस एम एस अलर्ट सुविधा, पारिजात नेक्स्ट एजन्सी मोबाईल ॲप, बि. बी. पि. एस. युटीलिटी बिलभरणा** इत्यादी डिजीटल सेवा सुरू केल्या आहेत. **आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी** प्रणालीद्वारे ग्राहक सेवा उपलब्ध झाल्यामुळे खातेदार खुष व समाधानी आहेत. संस्थेच्या सर्व शाखा एकमेकांशी ऑनलाईन जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे. संस्थेने सुरू केलेल्या पारिजात डिजीटल सेवांमुळे **पारिजातची** जनमानसातील प्रतिमा आणखी उंचावली आहे.

अहवाल वर्षात संस्थेच्या चांगल्या कार्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा **राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा ''दिपस्तंभ पुरस्कार २०१८''** ने संस्थेस सन्मानीत करण्यात आले आहे. तसेच संस्थेस सलग तिन वर्षे **राज्यस्तरीय ''बँको पतसंस्था पुरस्कार''** मिळाले आहेत. दि. ३० सप्टेंबर २०१८ अखेर संस्थेचे **''१००'' कोटी ठेवींचे** उद्दिष्ट पूर्ण झाले असून सभासदांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये सभासदांच्या हस्ते **''दिपप्रज्वलन व सभासद संवाद सप्ताह कार्यक्रमाचे''** आयोजन करून एकूण १३३१ सभासदांशी संवाद साधला. संस्थेने सामाजिक बांधिलकीपोटी **केरळ पुरग्रस्तासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस आर्थिक मदत** दिली आहे. तसेच **महंत आबानंदगिरी ट्रस्ट संचलित विद्यार्थी वसतिगृहास प्रिंटर व बायोमेट्रीक मशिन मदत** देऊन संस्थेने सामाजिक बांधीलकी जपली आहे. संस्थेच्या महिला सभासदांसाठी सर्व शाखांमधून **हळदी-कुंकू कार्यक्रमाचे** आयोजन करून महिलांना योग्य सन्मान दिला आहे. अहवाल सालातील या विशेष उल्लेखनीय घटना आहेत.

सर्व सभासद ठेवीदार हितचिंतक यांचा कामकाज सहभाग व विश्वास आणि आशिर्वाद यामुळेच संस्था दिमाखात यशस्वी वाटचाल करत आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत झटणारे अभ्यासू संचालक मंडळ, कर्तव्य तत्पर सेवकवर्ग व दैनंदीन ठेव प्रतिनिधी आणि जागरुक सभासद यामुळेच आपली **''पारिजात संस्था''** दिमाखात चौफेर सर्वांगीण प्रगती करीत पुढे चालली आहे. हिच संस्थेच्या चांगल्या कामाची पोचपावती आहे.

संस्थेच्या विनंतीस मान देऊन आपण वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहिलात व सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केलेत. याबददल आपणा सर्वांचे पुनश्च: आभार!

**जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!**

आपला सहकारी
**कृष्णा धुमाळ**
(अध्यक्ष)

## २२ वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१८-१९

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा २२ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा – तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

रु. लाखात

| तपशिल | ३१/०३/२०१८ रु. | ३१/०३/२०१९ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ३७३.१५ | ३९५.१२ | २१.९७ | ५.८९% |
| राखीव व इतर निधी | ७३७.८१ | ८३७.८१ | १००.०० | १३.५५% |
| सभासद ठेवी | ९५९६.०१ | ११०६९.५० | १४७३.४९ | १५.३६% |
| गुंतवणूक | २४८२.४७ | ३५४०.४५ | १०५७.९८ | ४२.६२% |
| सभासद कर्जे | ७८४२.२५ | ८२३४.४४ | ३९२.१९ | ५.००% |
| खेळते भांडवल | ११०१२.२२ | १२७१४.०३ | १७०१.८१ | १५.४५% |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व नि:स्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उदिद्ष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे, या बद्दल आपले दुमत होणार नाही, याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद :- १७९५६

गतवर्षी संस्थेचे १५६३५ सभासद होते, अहवाल वर्षात २४७१ नवीन सभासद झाले आणि १५० सभासदांनी राजीनामा दिल्याने अहवाल वर्षाअखेर १७९५६ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल :- ३९५.१२ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रूपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रू.३,७३,१४,७००/– इतके होते, त्यामध्ये अहवाल वर्षात रू. २१,९७,०००/– ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१९ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रू. ३,९५,११,७००/– इतके आहे. भाग भांडवल वाढीचे शेकडा प्रमाण ५.८८% आहे.

### गंगाजळी व इतर निधी :- ८३७.८१ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो. यानुसार संस्थेने विविध निधींची उभारणी केली आहे.

गतवर्षाचे संस्थेचे एकुण निधी रू. ७,३७,८०,७७४/– जमा होते. त्यामध्ये अहवाल साली रू. ९९,९९,९९९/– वाढ होऊन वर्षा अखेरीस एकुण निधी रू. ८,३७,८०,७७३/– इतका झाला आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण १३.५५% इतके आहे.

## ठेवी :- ११०६९.५० लाख

संस्थेने ठेव संकलनामध्ये अहवाल वर्षामध्ये नेत्रदिपक वाढ केलेली असून संस्था देत असलेली ग्राहक सेवा, तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले. दि. ३१/०३/२०१८ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रू. ९५,९६,००,६४४/- एवढ्या होत्या, त्यामध्ये अहवाल वर्षात रू. १४,७३,४९,०३३/- ठेवींची वाढ होऊन दि. ३१/०३/२०१९ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रू.१,१०,६९,४९,६७७/- झाल्या आहेत. ठेव वाढीचे शेकडा प्रमाण १५.३६% इतके आहे.

संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

रु. लाखात

| ठेवीचा प्रकार | सन २०१५-१६ | सन २०१६-१७ | सन २०१७-१८ | सन २०१८-१९ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ५,८६,७८,८४१ | ७,४५,९५,१९९ | ६,४०,३३,८४९ | ७,७२,८२,९४८ |
| दैनंदिन बचत ठेव | १५,७३,६१,६७७ | १२,४०,५४,९१६ | १३,७१,५७,१०३ | १३,८५,५८,२८७ |
| अल्प मुदत ठेव | ६,०५,४२,०४२ | ६,८०,७५,९१४ | ४,७७,१२,८७२ | ५,२१,५३,६३३ |
| मुदत ठेव | ५,०८,८७,२४५ | १३,२६,३५,३१६ | १२,९४,४४,११३ | ६,४२,८०,७२८ |
| दाम दुप्पट ठेव | ३,८३,४१,४४३ | ४,२१,५४,६७७ | ४,४२,३९,००१ | ४,६५,५०,७६० |
| पारिजात बक्षीस ठेव | १,३४,९६७ | १,३४,९६७ | १,३३,९६७ | १,३३,९६७ |
| मासिक व्याज प्राप्ती ठेव | ८,०७,९०,९०० | १०,५८,६७,३०० | १०,३७,७५,२१५ | ६,०३,२६,९१५ |
| आवर्त ठेव | ५०,७२,२३२ | ६४,२०,४८४ | ६३,०३,७५६ | ८७,३२,६२४ |
| सभासद ठेव | ३५,०७,३६३ | ३६,९१,८३२ | ३९,३१,२७३ | ३९,०३,४५८ |
| शुभकार्य ठेव | ३,९८,८६,४०९ | ३,९५,७९,०९४ | ४,०२,५९,९०५ | ३,७३,०७,९०० |
| शुभलक्ष्मी ठेव | २,६४,१२,३१३ | २,६९,७७,४८९ | २,७७,६६,१५० | ३,२०,८३,३१४ |
| पारिजात ठेव | २९,७३९ | २९,७३९ | २९,७३९ | २९,७३९ |
| वैभवलक्ष्मी ठेव | ९,३८,४३,१७६ | ५,१७,६९,२१५ | १९,०६,३५३ | ५२,४२९ |
| धनसंचय ठेव | ८,३१,९५,८३३ | १०,९२,२७,३८९ | २९,०४,५१५ | ० |
| धनसमृध्दी ठेव | ८,६७,२३,७४९ | ५४,३५,४४५ | ७,३६,५२१ | २,२६,१२१ |
| शुभसंकल्प ठेव | ४१,५५,२७९ | १,०६,४०,५२४ | १,६४,१९,५४६ | २,४१,९९,१२९ |
| स्वप्नपुर्ती ठेव | ६१,२१,७०९ | १,०३,४१,६६१ | १,५०,४८,५२४ | २,४६,४२,०३३ |
| इंद्रधनु ठेव | ० | ० | ४,७६,५४,४३० | ० |
| वर्षाऋतू ठेव | ० | ० | ६,५२,४८,९०२ | ४६,८७,५२० |
| उत्कर्ष ठेव | ० | ० | ४,२८,५५,१२५ | ४,२६,१३,७५६ |
| पारिजात मासिक प्राप्ती ठेव | ० | ० | ४,७७,०४,३०० | १६,२४,५७,७१८ |
| शुभारंभ ठेव | ० | ० | ९,५८,९२,१७७ | ११,४०,६३,६३५ |
| गृहलक्ष्मी ठेव | ० | ० | १,८४,४२,५०८ | २,६९,००,८८१ |
| वसंतऋतू ठेव | ० | ० | ० | ११,२५,९४,४१७ |
| लोकमंगल ठेव | ० | ० | ० | ७,३१,६७,७६५ |
| एकूण रू. | ७९,५६,८४,११७ | ८१,१६,३१,२४१ | ९५,९६,००,६४४ | ११०,६९,४९,६७७ |

## गुंतवणूक :- रू. ३५४०.४५ लाख

संस्थेने सभासदांना कर्ज वाटप करूनही काही रक्कम शिल्लक राहिली ती रक्कम तशीच शिल्लक न ठेवता विविध बँका मध्ये त्यांची गुंतवणूक करून त्यापासून व्याज मिळवून उत्पन्न वाढीचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या बॅकींग क्षेत्रातील विविध बदलांमुळे गुंतवणूक ही आवश्यक बाब झाली आहे. कायदेशीर बाबींची पुर्तता म्हणूनही गुंतवणूकीस महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक वर्षात संस्थेने रोख तरलता प्रमाण (CRR) व वैधानिक तरलता प्रमाण (SLR) योग्य प्रकारे दैनंदिन पध्दतीवर ठेऊन महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केले आहे.

दि. ३१/०३/२०१९ अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रू.३५,४०,४५,२०४/– एवढी आहे.

रु. लाखात

| अ. क्र. | गुंतवणूक तपशील | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १) | दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक. लि., भाग | १,०००.०० |
| २) | महाराष्ट्र राज्य सहकारी पत. फेडरेशन लि., भाग | ३,०००.०० |
| ३) | ठाणे शहर सहकारी संस्था फेडरेशन लि., भाग | १,०००.०० |
| ४) | राखीव निधी (रिझर्व फंड) | २,३०,०२,४५२.०० |
| ५) | संशयित व बुडीत कर्ज निधी | ८०,६७,५२१.०० |
| ६) | लाभांश समानिकरण निधी | १४,७३,५८०.०० |
| ७) | सभासद कल्याण निधी | ६,६५,५११.०० |
| ८) | सेवक कल्याण निधी | ५,३६,७७४.०० |
| ९) | धर्मादाय निधी | ९६,८१२.०० |
| १०) | मुदत ठेव गुंतवणूक | ३२,०१,९७,५५४.०० |
| | एकूण | ३५,४०,४५,२०४.०० |

## कर्ज :- रू. ८२३४.४४ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सुचनांनूसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जिवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबध्द आहे, म्हणुनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राध्यान्याने कर्ज पुरवठा करून सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षा अखेर संस्थेचे रू. ७८,४२,२५,४५८/– कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रू. ३७,१८,०७,२७०/– नव्याने कर्ज वाटप केले असून रू. ३३,२५,८८,३६५/– कर्ज वसूल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रू.८२,३४,४४,३६३/– कर्ज येणे बाकी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ५% एवढे आहे.

## कर्ज थकबाकी :- प्रमाण ४.१०%

पतसंस्थेच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. याबाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे तसेच थकबाकी होऊ न देण्यासाठी वेळोवेळी कर्जवसुलीसाठी शाखास्तरावर केलेला पाठपुरवठा यामुळे कर्जथकबाकी मर्यादित ठेवण्यात संस्था यशस्वी झालेली आहे. मार्च २०१९ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण ४.१०% आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतुदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासुन (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस ''अनुत्पादक मालमत्ता'' (Non Performing Assets) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते.

त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार सहकारी पतसंस्था साठी एन.पी.ए निकष लागू केले आहेत. संस्थेने त्याबाबात प्रभावी व्यवस्थापन ठेऊन एन.पी.ए. नियंत्रणात ठेवला आहे.

सदर अनुत्पादीत कर्जासाठी संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१९ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

रु. लाखात

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | प्रत्यक्ष तरतूद | N.P.A. साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १) | **उत्पादित जिंदगी** | ७२२७.६१ | १८.१५ | — |
| २) | **अनुत्पादीत जिंदगी**<br>(अ) सर्वसाधारण जिंदगी<br>(ब) संशयीत जिंदगी<br>(क) बुडीत जिंदगी | <br>५५६.५८<br>४५०.२५ | ८२.५० | <br>२७.८३<br>५४.६५ |
| | एकूण | ८२३४.४४ | १००.६५ | ८२.४८ |

एन.पी.ए.साठी आवश्यक तरतुद रू.८२.४८ लाख असताना संस्थेने स्वच्छेने प्रत्यक्ष तरतूद रू. ८२.५० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात ''उत्पादित जिंदगी'' (Performing Assets) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५% प्रमाणे) तरतूद रू. १८.१५ लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे, हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल :- रू. १२७१४.०३ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रू. १,१०,१२,२१,५४१/- एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे रू. १७,०१,८१,३७४/- ने वाढून रू. १,२७,१४,०२,९१५/- इतके झाले आहे. खेळते भांडवल वाढीचे प्रमाण १५.४५% इतके आहे.

## संचालक मंडळ सभा:-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण २४ सभा होऊन एकूण ३८८ ठराव पारित करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी व वितरण समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या एकूण ४४ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर नियोजन समिती, कर्मचारी विषयक समिती, लेखापरिक्षण समिती व कर्ज वसुली समिती यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सभा घेण्यात आल्या. मा. संचालक मंडळ व सर्व समितीच्या मिळून अहवाल वर्षात एकुण ११० सभा घेण्यात आल्या.


आपल्या खात्यावर 'वारस' नोंद केली नसल्यास सदरची नोंद त्वरीत करा.

## सभासद, संचालक व कर्मचारी प्रशिक्षण:-

तंत्रज्ञानामध्ये सतत प्रगती होत असते, तसेच नियमांत वांरवार बदल होत असतात. संस्थेचे कर्मचारी व संचालक यांचे ज्ञान अद्ययावत रहावे या हेतूने तसेच शाखापातळीवरील कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे, स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलण्यासाठी, ग्राहकांना चांगली व समाधनाकारक सेवा देणे याकरिता संस्थेतील सर्व कर्मचारी यांना विविध माध्यमातून सतत प्रशिक्षण देण्यात येते. अहवाल वर्षात संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, ठाणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, ठाणे शहर सहकारी पतसंस्था फेडरेशन आणि सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था मर्यादित या शासनमान्य प्रशिक्षण संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण वर्गास संचालक व कर्मचाऱ्यांना टप्प्या टप्याने पाठवून सर्वांना प्रशिक्षण दिलेले आहे.

## नफा विभागणी :- रू. ११०.०५ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतूदी वजा जाता रू. १,१०,०४,९५५.४६ नफा झालेला असुन गतवर्षीचा शिल्लक नफा रू. ३३१.०३ मिळुन नफा रू. १,१०,०५,२८६.४९ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढील प्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | | रक्कम रूपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रू. | २७,५१,५००.०० |
| लाभांश (१०% प्रमाणे) | रू. | ३६,५०,९६९.०० |
| लाभांश समानिकरण निधी | रू. | २,००,०००.०० |
| रौप्य महोत्सव निधी | रू. | ५,००,०००.०० |
| इमारत निधी | रू. | १८,५०,०००.०० |
| संशयित व बुडीत कर्ज निधी | रू. | १५,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रू. | १,०२,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | रू. | ५५,०००.०० |
| गुंतवणूक चढउतार निधी | रू. | १,००,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | रू. | १,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रू. | १,५०,०००.०० |
| धर्मादाय निधी | रू. | ४५,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रू. | ८१७.४९ |
| एकुण | रू. | १,१०,०५,२८६.४९ |

## लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री. योगेश पाटील ॲण्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्गार काढले व संस्थेस ऑडीट वर्ग "अ" प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. किरण अे. भोसले ॲण्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट) यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## उल्लेखनीय बाबी:-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे:-

१) **''कोअर बँकिंग संगणक प्रणाली''** : संस्थेची प्रगती करायची असेल तर तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही हे ओळखुन सभासद व खातेदार यांना तत्पर अचुक अत्याधुनिक तंत्राद्वारे सेवा देता यावी, याकरीता संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे स्वमालकीचे **''डाटा सेंटर''** उभारून **''कोअर बँकिंग संगणक प्रणाली''** सेवेचा अवलंब केला आहे. संस्थेच्या सर्व शाखा एकमेकाशी जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे.

२) **पारिजात डिजीटल सेवा** : अहवाल वर्षात संस्थेने सभासदांसाठी सुरू केलेल्या विविध पारिजात डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमानसातील प्रतिमा उंचावली आहे.

अ. **पारिजात एम पासबुक सेवा** : संस्थेने पारिजात एम पासबुक सेवा सुरू करून सर्व सभासदांना ठेव व कर्जखात्याची माहिती मोबाईल ॲपवर उपलब्ध केली आहे. सभासदांनी गुगल प्ले स्टोअर मधुन संस्थेचे मोबाईल ॲप आपल्या मोबाईलवर डाउनलोड करावे अथवा दै. ठेव प्रतिनिधी किंवा शाखेशी संपर्क साधावा.

ब. **एस.एम.एस. सुविधा** : संस्थेने एस.एम.एस. सुविधा सुरू करून सभासदांना खात्यामधील व्यवहारांची माहीती, ठेव मुदतपुर्ती दिनांक, कर्जहप्ता इ.एम.आय. सुचना इ. माहिती एस.एम.एस. सुविधेद्वारे देण्यात येते.

क. **बी.बी.पी.एस. युटीलीटी बील** : संस्थेच्या सभासदांची सर्व प्रकारची दैनंदिन वापराची बिले उदा. वीजबील, फोनबील, गॅस बील, डी.टी.एच. रिचार्ज इ. बिले संस्थेच्या सर्व शाखांमधुन भरण्याची सुविधा बी.बी.पी.एस युटीलिटी बिल सेवा या द्वारे उपलब्ध केली आहे.

ड. **पारिजात नेक्स्ट मोबाईल ॲप** : संस्थेने पारिजात नेक्स्ट मोबाईल ॲप सुरू केले असुन सदर मोबाईल ॲपचा वापर करून संस्थेचे दैनंदिन ठेव प्रतिनिधी ठेव वसुलीचे काम करत आहेत. सदर मोबाईल ॲप सुविधेमुळे खातेदारास तात्काळ खात्याविषयी माहिती उपलब्ध होत आहे.

इ. **आर.टी.जी.एस / एन.ई.एफ.टी** प्रणाली द्वारे खातेदारांना रक्कम हस्तांतरीत करणे सोपे व जलद झाले आहे.

३) **पुरस्कार** :-

अ. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा **''दिपस्तंभ पुरस्कार २०१८''** ने सन्मानीत संस्था.

ब. सलग तिन वर्षे राज्यस्तरीय **''बँको पतसंस्था पुरस्काराने''** सन्मानित संस्था (सन २०१६, २०१७, २०१८)

४) **सामाजिक कार्ये** :-

अ. केरळ पुरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत आर्थिक मदत देऊन संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

ब. महंत आबानंद गिरी ट्रस्ट संचलित विद्यालयास प्रिंटर व बायोमेट्रीक मशिन मदत देऊन संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

क. **हळदी-कुंकू समारंभ** : अहवाल वर्षात संस्थेच्या सर्व शाखांमध्ये दि. १८ जानेवारी २०१९ ते १२ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत महिला सभासदांकरिता हळदी-कुंकू समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास एकुण १२४५ महिला सभासद उपस्थित होत्या. महिला सभासदांसाठी खास हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करून महिलांना योग्य सन्मान देऊन त्या माध्यमातून संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

५) **सर्वोत्तम शाखा पुरस्कार** :

संस्थेच्या कर्मचारी वर्गास प्रोत्साहीत करण्यासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शाखेस व कर्मचाऱ्यांस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात सर्वोत्तम शाखा पुरस्कार **चंदननगर** शाखेस प्राप्त झाला आहे.

**६) सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी पुरस्कार :**

मार्च २०१९ अखेर संस्थेकडे ११५ दैनंदिन ठेव प्रतिनिधी काम करीत आहेत. दैनंदिन ठेव वसुलीत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या दैनंदिन ठेव प्रतिनिधीस सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी म्हणुन सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात मुंबई व पुणे विभागातुन सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधीचा मान **सिंहगड रोड शाखेचे** ठेव प्रतिनिधी **श्री.राजेंद्र दौलतराव कोंडे** यांना प्राप्त झाला आहे.

**७) अभिनंदनीय : -**

राष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या सहकार भारती या संस्थेच्या कोकण प्रांत कार्यकरणीच्या नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदी पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पांडुरंग धुमाळ यांची नेमणुक झाल्याबद्ल हार्दिक अभिनंदन!!!

## आभार :-

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक., ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., नवी मुंबई को-ऑप. बँक लि., कॉसमॉस को-ऑप.बँक लि., नॅशनल को-ऑप. बँक लि., अभ्युदय को-ऑप.बँक लि., महानगर को-ऑप.बँक लि., राजर्षी शाहु सहकारी बँक लि., दि सातारा सहकारी बँक लि., अपना सह बँक लि., कुर्ला ना. सह. बँक लि., पंजाब नॅशनल बँक लि., सारस्वत को-ऑप.बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि., पंजाब अॅण्ड महाराष्ट्र को-ऑप बँक लि., जी.पी.पारसिक जनता सह. बँक लि., आय.सी.आय.सी.आय बँक, भारत को-ऑप. बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे वैधानीक लेखापरिक्षक श्री. योगेश पाटील अॅण्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट) संस्थेंचे अंतर्गत लेखापरिक्षक श्री. किरण अे. भोसले अॅण्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट) आणि कर लेखा परिक्षक श्री. बी. आर. सावंत, संगणकासाठी में. ट्रस्ट सिस्टम्स अॅन्ड सॉफ्टवेअर तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार अॅड. सोपान डुंबरे, अॅड. श्री. विलास बारवकर, अॅड. श्री. विजय नलावडे यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले, त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी, अशी प्रार्थना करतो.

## श्रध्दांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत, त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करून त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

जय हिंद । जय महाराष्ट्र ।। जय सहकार।।।

आपला सहकारी

कृष्णा पां. धुमाळ

(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २०१९

| 31.03.2018 रु. पैसे | CAPITAL & LIABILITIES / भांडवल व देणी | रु. पैसे | 31.03.2019 रु. पैसे |
|---|---|---|---|
| | SHARE CAPITAL / भाग भांडवल | | |
| 5,00,00,000.00 | AUTHORISED SHARE CAPITAL /अधिकृत भाग भांडवल | | 5,00,00,000.00 |
| 3,73,14,700.00 | PAID UP SHARE CAPITAL / वसूल भाग भांडवल | | 3,95,11,700.00 |
| | RESERVE & OTHER FUND / राखीव व अन्य निधी | | |
| 1,87,13,382.00 | 1. Reserve Fund / राखीव निधी | 2,22,83,163.00 | |
| 3,52,62,426.00 | 2. Building Fund / इमारत निधी | 3,87,76,406.00 | |
| 62,10,000.00 | 3. Reserve For Bad & Doubt. Debts./ संशयित व बुडीत कर्ज निधी | 82,50,000.00 | |
| 43,999.00 | 4.Charity Fund / धर्मादाय निधी | 30,199.00 | |
| 12,12,000.00 | 5. Div. Equalisation Fund / लाभांश समानिकरण निधी | 14,12,000.00 | |
| 6,13,105.00 | 6. Member Welfare Fund / सभासद कल्याण निधी | 5,04,434.00 | |
| 4,37,000.00 | 7. Staff Welfare Fund / कर्मचारी कल्याण निधी | 4,82,000.00 | |
| 3,40,201.00 | 8. Co-op Education Fund / सहकार प्रशिक्षण निधी | 3,78,910.00 | |
| 36,06,000.00 | 9. Contingency Fund / आकस्मिक निधी | 25,46,000.00 | |
| 10,15,000.00 | 10. Invest. Fluctuation Fund / गुंतवणूक चढउतार निधी | 12,15,000.00 | |
| 11,82,500.00 | 11. Silver Jubilee Fund / रौप्य महोत्सव निधी | 16,82,500.00 | |
| 17,90,000.00 | 12. Contingent Prov. Agst Stand. Assets / उत्पादित कर्ज निधी | 18,15,000.00 | |
| 30,63,963.00 | 13. Information Technology Fund / माहिती तंत्रज्ञान निधी | 40,63,963.00 | |
| 2,91,198.00 | 14. Election Fund / निवडणूक निधी | 3,41,198.00 | 8,37,80,773.00 |
| | DEPOSITS / ठेवी | | |
| 6,40,33,849.30 | 1. Saving Deposit / बचत ठेव | 7,72,82,948.77 | |
| 13,71,57,103.00 | 2. Daily Deposit / दैनंदिन ठेव | 13,85,58,287.00 | |
| 39,31,273.00 | 3. Member Deposit / सभासद ठेव | 39,03,458.00 | |
| 63,03,756.00 | 4. Recurring Deposit / आवर्त ठेव | 87,32,624.00 | |
| 4,02,59,905.00 | 5. Shubhkarya Deposit / शुभकार्य ठेव | 3,73,07,900.00 | |
| 2,77,66,150.00 | 6. Shubhlaxmi Deposit / शुभलक्ष्मी ठेव | 3,20,83,314.00 | |
| 1,64,19,546.00 | 7. Shubhsankalp Deposit / शुभसंकल्प ठेव | 2,41,99,129.00 | |
| 4,77,12,872.00 | 8. Short Term Deposit / अल्प मुदत ठेव | 5,21,53,633.00 | |
| 12,94,44,913.00 | 9. Term Deposit / मुदत ठेव | 6,42,80,728.00 | |
| 10,37,75,215.00 | 10. Monthly Income Scheme Deposit / मासिक व्याज प्राप्ती ठेव | 6,03,26,915.00 | |
| 4,42,39,001.00 | 11. Double Deposit / दाम दुप्पट ठेव | 4,65,50,760.00 | |
| 1,33,967.00 | 12. Parijat Prize Deposit / पारिजात बक्षीस ठेव | 1,33,967.00 | |
| 29,739.00 | 13. Parijat Deposit / पारिजात ठेव | 29,739.00 | |
| 19,06,353.00 | 14. Vaibhavlaxmi Deposit / वैभवलक्ष्मी ठेव | 52,429.00 | |
| 29,04,515.00 | 15. Dhansanchay Deposit / धनसंचय ठेव | 0.00 | |
| 73,71,13,631.30 | BALANCE C/F / पुढील पानावर..... | | 12,32,92,473.00 |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| 31.03.2018 रु. पैसे | PROPERTY & ASSETS / मालमत्ता व येणी | रु. पैसे | 31.03.2019 रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **CASH & BANK BALANCES / रोख व बँक शिल्लक** | | |
| 32,72,618.44 | 1. Cash In Hand / रोख शिल्लक | 20,23,311.70 | |
| 56,08,840.83 | 2. Cash at Bank / बँक शिल्लक | 2,52,88,591.26 | 2,73,11,902.96 |
| | **INVESTMENT / गुंतवणूक** | | |
| 1,000.00 | 1. Share at T.D.C.C Bank Ltd. /ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह बँक लि. भाग | 1,000.00 | |
| 3,000.00 | 2. Share at M.S.C. Soc.Fed /महा. राज्य सह. पतसंस्था फेडरेशन भाग | 3,000.00 | |
| 0.00 | 3. Share at Thane City Soc.Fed/ठाणे शहर सह. पतसंस्था फेडरेशन भाग | 1,000.00 | |
| 1,89,29,413.00 | 4. T.D.C.C.Bank Ltd (Reserve Fund)/ठाणे जिल्हा मध्य. सह बँक (राखीव निधी) | 2,30,02,452.00 | |
| 90,34,701.00 | 5. T.D.C.C. Bank Ltd (Other Fund)/ठाणे जिल्हा मध्य. सह बँक (इतर निधी) | 1,08,40,198.00 | |
| 1,79,22,468.00 | 6. T.D.C.C. Bank Ltd / ठाणे जिल्हा मध्य. सह बँक (मुदत ठेव) | 1,79,22,468.00 | |
| 2,14,87,315.00 | 7. Navi Mumbai Co-op Bank Ltd /नवी मुंबई को - ऑप बँक (मुदत ठेव) | 2,80,14,320.00 | |
| 47,50,000.00 | 8. National Co-op Bank Ltd /नॅशनल को-ऑप बँक (मुदत ठेव) | 47,50,000.00 | |
| 50,14,487.00 | 9. Abhyudaya Co-op Bank Ltd /अभ्युदय को-ऑप बँक (मुदत ठेव) | 50,14,487.00 | |
| 42,23,780.00 | 10. Saraswat Co-op Bank /सारस्वत को-ऑप बँक (मुदत ठेव) | 42,23,780.00 | |
| 1,40,41,667.00 | 11. Apna Sahakari Bank /अपना सह. बँक (मुदत ठेव) | 2,70,80,871.00 | |
| 1,00,00,000.00 | 12. Mahanagar Co-op Bank /महानगर को-ऑप. बँक (मुदत ठेव) | 1,08,05,600.00 | |
| 2,60,00,000.00 | 13. Punjab & Maha. Co-op Bank /पंजाब ॲन्ड महा.को-ऑप. बँक (मुदत ठेव) | 2,41,91,726.00 | |
| 86,80,510.00 | 14. Shamrao Vitthal Co-op Bank/शामराव विठ्ठल को-ऑप.बँक (मुदत ठेव) | 1,88,35,770.00 | |
| 0.00 | 15. TJSB Saha. Bank Ltd. /ठाणे जनता सह. बँक. लि (मुदत ठेव) | 2,45,00,000.00 | |
| 3,19,58,175.00 | 16. GP Parsik Sah. Bank Ltd. /जी.पी. पारसिक सह. बँक लि. (मुदत ठेव) | 2,44,62,751.00 | |
| 25,00,000.00 | 17. D.M.K. Jaoli Sah. Bank Ltd./डी.एम.के.जावली सह बँक लि.(मुदत ठेव) | 2,90,00,000.00 | |
| 1,25,00,000.00 | 18. Satara Sah. Bank Ltd. /सातारा सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 1,75,00,000.00 | |
| 2,20,00,000.00 | 19. Sharad Sah. Bank Ltd. /शरद सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 1,25,00,000.00 | |
| 3,17,00,000.00 | 20. Bharat Co-op Bank Ltd. /भारत को-ऑप बँक लि. (मुदत ठेव) | 4,48,75,377.00 | |
| 50,00,000.00 | 21. Shree Warna Sah. Bank Ltd. /श्री वारणा सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 55,20,404.00 | |
| 25,00,000.00 | 22. Shree Veershaiv Co-op Bank Ltd./श्री विरशैव को-ऑप बँक लि.(मुदत ठेव) | 50,00,000.00 | |
| 0.00 | 23. Kalyan Janta Sah.Bank Ltd./कल्याण जनता सहकारी बँक लि.(मुदत ठेव) | 75,00,000.00 | |
| 0.00 | 24. Yashwant Sah.Bank Ltd./यशवंत सहकारी बँक लि. (मुदत ठेव) | 10,00,000.00 | |
| 0.00 | 25. Rajaram Bapu Sah.Bank Ltd /राजाराम बापु सहकारी बँक लि.(मुदत ठेव) | 75,00,000.00 | 35,40,45,204.00 |
| | **LOANS / कर्जे** | | |
| 2,88,29,702.00 | 1. Personal Loan / वैयक्तिक कर्ज | 2,71,32,699.00 | |
| 1,66,25,101.00 | 2. Business Loan / व्यवसाय तारण कर्ज | 1,50,90,594.00 | |
| 61,09,734.00 | 3. Vehicle Loan / वाहन तारण कर्ज | 54,20,521.00 | |
| 49,24,33,545.00 | 4. Secured Loan / सुरक्षित तारण कर्ज | 54,60,51,490.00 | |
| 11,03,391.00 | 5. Other Secured Loan / इतर तारण कर्ज | 1,69,425.00 | |
| 2,92,096.00 | 6. Govt. Security Loan / शासकीय रोखे तारण कर्ज | 2,93,923.00 | |
| 98,18,741.00 | 7. Case File Loan / दावा दाखल कर्ज | 62,70,945.00 | |
| 39,67,813.00 | 8. Staff Personal Loan / कर्मचारी वैयक्तिक कर्ज | 51,46,375.00 | |
| 5,18,809.00 | 9. Staff Vehicle Loan / कर्मचारी वाहनतारण कर्ज | 8,78,557.00 | |
| 58,77,263.00 | 10. Staff Housing Loan / कर्मचारी घरतारण कर्ज | 74,14,966.00 | |
| 22,78,121.00 | 11. Agent Loan / दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | 35,64,568.00 | |
| 5,42,47,956.00 | 12. Deposit Loan / ठेव तारण कर्ज | 5,52,93,963.00 | |
| 1,11,11,372.00 | 13. Gold Loan / सोने तारण कर्ज | 1,56,94,043.00 | |
| 89,03,41,619.27 | BALANCE C/F / पुढील पानावर..... | | 38,13,57,106.96 |

## दि. ३१ मार्च २०१९

| 31.03.2018 रु. पैसे | CAPITAL & LIABILITIES / भांडवल व देणी | रु. पैसे | 31.03.2019 रु. पैसे |
|---|---|---|---|
| 73,71,13,631.30 | **BALANCE B/F मागील पानावरुन....** | | 12,32,92,473.00 |
| 7,36,521.00 | 16. Dhansamruddhi Deposit / धनसमृद्धी ठेव | 2,26,121.00 | |
| 1,50,48,524.00 | 17. Swapnapurti Deposit / स्वप्नपुर्ती ठेव | 2,46,42,033.00 | |
| 4,76,54,430.00 | 18. Indradhanu Deposit / इंद्रधनु ठेव | 0.00 | |
| 6,52,48,902.00 | 19. Varshahrutu Deposit / वर्षाऋतु ठेव | 46,87,520.00 | |
